
# निसर्ग संवर्धनाची वेगळी वाट

गेल्या साधारण शतकभरात, पृथ्वीवरच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा अत्यंत बेसुमार आणि निष्काळजीपणे वापर झाला. परिणामी, आज जगापुढे, निसर्गाचा खालावलेला दर्जा, आणि पर्यावरणाचा ढासळलेला समतोल, ही मोठी आव्हानं उभी आहेत. या समस्याचं गांभीर्य जाणून, त्यावर काम करणाऱ्या अनेक लहान-मोठ्या संस्था आणि व्यक्ती आज जगभर आहेत. याच विषयावर एका वेगळ्या आणि नावीन्यपूर्ण मार्गाने काम करणारी एक संस्था, म्हणजे 'ऑयकॉस फॉर इकॉलॉजिकल सर्व्हिसेस'. पुण्याच्या केतकी घाटे आणि मानसी करंदीकर या दोघींनी साधारण सहा वर्षांपूर्वी ऑयकॉस ही 'इकॉलॉजिकल कन्सल्टन्सी' सुरू केली.

पुण्याची मानसी आणि मूळची चाळीसगावची केतकी, दोघींनीही आपलं पदवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुण्या मधल्या इकॉलॉजिकल सोसायटीचा 'नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट' हा एक वर्षाचा कोर्स केला. भारतातल्या वेगवेगळ्या नैसर्गिक परिसंस्था, तिथली जैव-विविधता, धोक्यात असलेलं पर्यावरण, आणि त्याचा दर्जा उंचावण्यासाठी करता येण्यासारखे उपाय, असा या कोर्सचा आवाका आहे. हे शिकताना दोघींनाही जाणीव झाली, की पर्यावरणाच्या प्रश्नाबद्दल फक्त लिहिणं, बोलणं, किंवा छंद म्हणून थोडा वेळ काम करणं हे पुरेसं नाही, तर पूर्ण वेळ, व्यवसाय म्हणूनच हे क्षेत्र स्वीकारायला हवं. या विचारामुळे दोघी एकत्र आल्या. इकॉलॉजिकल सोसायटीच्या प्रकाश गोळे सरांचं मार्गदर्शन मिळाल्यानंतर नेमकं कशा प्रकारचं काम करायचं हे निश्चित झालं, आणि त्यातून 'ऑयकॉस' चा जन्म झाला. ऑयकॉस या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे, 'घर', 'कुटुंब', किंवा 'पृथ्वी'. इको या इंग्लिश शब्दाचं मूळ ऑयकॉस मधे आहे. ऑयकॉस ही इकॉलॉजिकल कन्सल्टन्सी तीन प्रकारच्या क्षेत्रांमधे काम करते: नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट, इकॉलॉजिकल लँडस्केपिंग, आणि इको टूरिझम प्लॅनिंग.



नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट, म्हणजे निसर्गाचं व्यवस्थापन. पर्यावरणाचा बिघडलेला समतोल सुधारण्यासाठी, नैसर्गिक साधन संपत्तीचा आणि जैव-विविधतेचा जो प्रचंड ऱ्हास झाला आहे, तो शक्य तितक्या प्रमाणात भरून काढण्यासाठी, धोक्यात असणाऱ्या नैसर्गिक घटकांचं पुनरुज्जीवन करण्यासाठी, आणि आज चांगल्या स्थितीत आहेत, त्या नैसर्गिक परिसंस्थांचं संवर्धन करण्यासाठीचे प्रयत्न म्हणजे निसर्गाचं व्यवस्थापन.

एखाद्या जमिनीचं लँडस्केपिंग करताना केवळ सौंदर्यदृष्टीने रचना न करता त्याठिकाणी उपलब्ध असलेली साधनं वापरून, उर्जेची शक्य तितकी बचत करून, आणि कटाक्षाने स्थानिक झाडंच वापरून केलेली सौंदर्यपूर्ण रचना, म्हणजे इकॉलॉजिकल लँडस्केपिंग. आणि नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास झालेला भाग पुनरुज्जीवित करून तिथल्या निसर्गाला धोका निर्माण न करणारं, आणि त्याही पलीकडे जाऊन, त्या नैसर्गिक रचनेत, सामावलं जाईल, असं पर्यटनस्थळ निर्माण करणं, असं इको टूरिझमचं वर्णन करता येईल.

ऑयकॉसच्या तिन्ही प्रकारच्या कामांना एकत्र बांधणारं सुत्र आहे ते निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचं आणि संवर्धनाचं. केवळ नेत्रसुखाचा विचार न करता देशी आणि स्थानिक झाडांचाच वापर करून, इथल्या पर्यावरणाशी एकरूप होईल अशीच नैसर्गिक आणि शाश्वत व्यवस्था निर्माण करायची, हे त्यांचं तत्त्व आहे. एका अर्थाने पर्यावरणवादी चळवळीचा भाग आहे. आणि तरीही, ऑयकॉसचं एक वेगळेपण म्हणजे ही एक स्वयंसेवी संस्था नसून एक व्यावसायिक संस्था आहे. पर्यावरणाच्या प्रश्नासाठी काम करताना केवळ छंद म्हणून, आवड म्हणून, किंवा सामाजिक बांधिलकी म्हणून बघता येऊ शकतं, याचं हे उदाहरण आहे. अर्थातच व्यवसाय, मॅनेजमेंट, लोकशातही औपचारिक शिक्षण नसल्यामुळे सुरुवातीला,



स्थिरस्थावर होईपर्यंत काही टक्केटोणपे खाल्ले पण हळूहळू व्यवस्थापन, अर्थव्यवहार, मार्केटिंग ही व्यवसायासाठी लागणारी सर्व कौशल्येही त्यांना नीट जमली आहेत. मुळात इंजिनियरिंगची विद्यार्थीनी असलेल्या मानसीने व्यवसायाचे तांत्रिक भाग चटकन आत्मसात केले, तर लहानपणापासून चित्रकलेत रस असणाऱ्या केतकीला रचनाशास्त्राचा कलात्मक भाग अधिक मनापासून आवडतो केतकीला झाडं आणि मानसीला प्राणी जास्त जवळचे वाटत असल्यामुळे प्रत्यक्ष काम करतानाही नकळत तशी विभागणी होऊन जाते. एकमेकींमधे इतका सहज समन्वय साधला गेल्यामुळे दोघीच असूनही हे काम त्या समर्थपणे सांभाळत आहेत.

ऑयकॉसचे मुख्य ग्राहक आहेत खाजगी जमीनमालक ज्यांची पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लावण्याची क्षमता आहे, आणि जबाबदारीही आहे. त्याचबरोबर काही उद्योगांसाठीही ऑयकॉसने लँडस्केपिंग आणि रिसोर्स मॅनेजमेंटचे प्रकल्प केले आहेत. केतकी आणि मानसीने कामाची सुरुवात केली तेव्हा ग्राहक मिळवणं हा भागच सगळ्यात कठीण होता. मुळात इकॉलॉजिकल कन्सल्टन्सी ही संकल्पनाच नवीन, फारशी न ऐकलेली आणि अगदी सुरुवातच असल्यामुळे प्रसिद्धधीसाठी पुरेशी साधनं नव्हती. 'किसान', 'एक्स्पो', 'सकाळ आरोग्य' यासारख्या प्रदर्शनांमधे सहभागी होऊन ऑयकॉसने लोकांपर्यंत पोचायला सुरुवात केली. ग्राहकाला चाकोरीतल्या कल्पनांच्या पलीकडे बघायला लावून निसर्गाच्या संवर्धनाचं महत्त्व आणि गरज समजावून, त्या जमिनीला सर्व अंगांनी योग्य ठरेल, तो पर्याय पटवून देणं, हेही आव्हानात्मक होतं. केतकी सांगते, 'लॉन' ही आपल्याकडे सगळ्यात जास्त प्रचलित झालेली संकल्पना आहे. खरं तर, वर्षभर पाणी असणाऱ्या प्रदेशात लॉन असायला हरकत नाही, पण आपल्यासारख्या पाण्यासाठी मोसमी पावसावर अवलंबून असणाऱ्या भागामधे लॉन हे पर्यावरणाच्या दृष्टीने अगदीच चुकीचे आहे. त्यामुळे, 'मोठं लॉन हवं' अशी लँडस्केपिंगबद्दल मनात कल्पना असणाऱ्या ग्राहकांना ऑयकॉसची तत्त्व पटवून देणं काहीसं अवघड होतं. लँडस्केपिंगचं काम पूर्ण होण्यासाठी सात-आठ माहिने एखादं वर्ष एवढा द्यावा लागतो. त्यामुळे कामाचं पूर्ण स्वरूप बघण्यासाठी तेवढा काळ थांबण्याची ग्राहकाची मानसिक तयारी लागते. कधीतरी यासाठी ग्राहकाकडून सहकार्य न मिळाल्याचाही अनुभव मानसी आणि केतकीने घेतला आहे. पण या कामचा अंतिम परिणाम इतका सुंदर असतो, की काम चालू असण्याच्या काळात ग्राहक वाट बघायला सहज तयार असतात.




आज ऑयकॉसकडे येणारे बरेसचे ग्राहक पर्यावरणाबद्दल, निसर्गाबद्दल आवड आणि प्रेम वाटणारे असल्यामुळे साधारणपणे ते ऑयकॉसची विचारधारा आणि त्यामागचा शास्त्रीच युक्तिवाद समजून त्यात, आणि त्यानुसार आपल्या संकल्पनांमधे बदल करतात. आज ऑयकॉसच्या ग्राहकांना याकन्सल्टन्सीबद्दल पूर्ण विश्वास वाटतो. मानसी आणि केतकी एखादी कल्पना मांडत आहेत, म्हणजे नक्कीच ती योग्य असणार, अशी खात्री त्यांना वाटते. ग्राहकांच्या या ठाम विश्वासाबरोबरच याकामाला मिळालेली आणखी एक पावती, म्हणजे अलिकडेच ऑयकॉसला मिळालेला 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' (MCICA) चा पुरस्कार. पर्यावरणाच्या क्षेत्रात नावीन्यपूर्ण आणि कल्पक मार्गाने सेवा पुरवणं आणि मार्गदर्शन करणं याबद्दलचा हा पुरस्कार आहे. ऑयकॉसच्या सुरुवातीपासून एवढ्या कमी काळात आपल्याकामाची अशी दखल घेतली गेली, याचा मानसी आणि केतकी यांना खरोखर अभिमान वाटतो.

'नेटिव्ह प्लांट्स', देशी आणि स्थानिक झाडं, हे ऑयकॉसच्या 'कॉमन मिनियम प्रिन्सिपल्स पैकी एक आहे. कामाची पद्धत आणि प्रकार हे जरी त्या त्या ठिकाणावर अवलंबून असले, तरी या मूलभूत तत्त्वांवर मानसी आणि केतकी कधीही तडजोड करत नाहीत. दोघी सांगतात की पर्यावरणाला धक्का निष्काळजीपणामुळे पोचतो, तितकाच तो अज्ञानामुळेही पोचतो. स्थानिक वनस्पतींना नैसर्गिक परिसंस्थेमधे महत्त्वाचं




स्थान असतं, त्यावर त्या ठिकाणच्या नैसर्गिक प्रक्रिया अवलंबून असतात. हेच जर लोकांना माहीत नसेल, मुळात स्थानिक झाडं कुठली, हेही माहीत नसेल, तर आवर्जून स्थानिक झाडं लावावीत, असा प्रयत्न होईलच कसा? गुलमोहर हे नेटिव्ह प्लांट नाही, हे खरंच किती जणांना माहीत असतं? म्हणूनच, या विषयावर मानसी आणि केतकीने एक उपक्रम केला होता. त्या त्या ठिकाणी जाऊन फोटोसकट सर्व माहिती गोळा केली, अशा तीनशे स्थानिक झाडांबद्दल माहिती मिळवल्यानंतर त्यांनी 'ग्रो नेटिव्हस' ही सीडी प्रकाशित केली आहे.

ऑयकॉसची लँडस्केपिंग आणि निसर्ग व्यवस्थापनाची सेवा ही फक्त मोठ्या जमिनींसाठी शक्य आहे. त्यामुळे शहरात राहणाऱ्या आणि मोजकीच जागा उपलब्ध असलेल्या निसर्गप्रेमींसाठी ऑयकॉसने पर्याय सुचवला आहे, तो नर्सरीचा. ऑयकॉसच्या नर्सरीमधे, अर्थातच फक्त देशी झाडंच मिळतात, आणि त्याबरोबरच, झाडं किंवा रोपं कुठली आणि कशी लावायची, याचं मार्गदर्शनही मिळतं. ऑयकॉसद्वारे चाललेल्या कामाबरोबरच इतरही जिथे शक्य होईल तिथे पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनाबद्दल जाणीव निर्माण करण्यासाठी केतकी आणि मानसीचे प्रयत्न चालू असतात. केतकी 'पुणे ट्री ऑथारिटी'च्या (पी.टी.ए.) पॅनलवर एक सदस्य आहे. पी.टी.ए. च्या प्रयत्नांमुळे आज पुण्यात रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांपैकी ऐंशी टक्के झाडं स्थानिक आहेत. त्याचबरोबर या दोघींनी ग्राम-मंगल, बायफ या स्वयंसेवी संस्थां-साठी काम केलं आहे. इकॉलॉजि-कल सोसायटीबरोबर त्यांचं काम चालू असतंच.



केतकी आणि मानसी म्हणतात, की लोकांमधे पर्यावर-णाबद्दल जागरुकता वाढते आहे, पण तेवढंच पुरेसं नाही. 'विकास विरुद्ध संवर्धन', 'डेव्हलपमेंट अगेन्स्ट काँझर्वेशन' हा खूप जुना वाद आहे. पण म्हणून पर्यावरणावादी जर विकासाला नाहीच म्हणत राहिले, तर काहीच बदल होणार नाही. विकास होत रहाणार, हे नक्कीच आहे, पण तो कशा पद्धतीने करायचा? हे आपण सुचवू शकतो. त्यातून पर्यावरणाला कमीतकमी अपाय होईल, असा पर्याय जर आपण मांडू शकलो, तर त्यामुळे काही अंशी तरी नैसर्गिक संपत्ती वाचवता येऊ शकते. असे पर्याय सुचवण्याचा प्रयत्न ऑयकॉस करतं.



आणि शेवटी, कुठलंही काम करताना त्यातून मिळणारा आनंद हाही खूप महत्त्वाचा असतो. निसर्गाच्या इतकं जवळ जाऊन काम करताना मानसी आणि केतकीने निखळ आनंदाचे अनेक क्षण अनुभवले आहेत. केतकी सांगते, एका फार्महाऊसवर काम करताना त्यांनी एका छोट्या भागात फुलपाखरांसाठी फूड प्लांट्स लावली. काम पूर्ण झाल्यानंतर काही काळाने निरीक्षणासाठी त्या परत तिथे गेल्या, तेव्हा एकेका झाडावर पन्नास फुलपाखरं गोळा झाली होती! एवढी फुलपाखरं अशी एकदम एकत्र त्यांचा नैसर्गिक अधिवासामधेही कदाचित सापडणार नाहीत. आपल्या कामाचा इतका सुंदर आणि जिवंत परिणाम बघून त्यांना किती आनंद झाला असेल, याची आपण कल्पनाचा करू शकतो. त्यांच्या प्रयत्नांना निसर्गानेच दिलेली ती दाद होती, मग आणखी काय हवं!

- मुक्ता परांजपे